# पाणी गुणवत्ता सनियंत्रण व सर्वेक्षण कार्यक्रमांतर्गत विभागीय, जिल्हा व उपविभागीय प्रयोगशाळे करीता कंत्राटी तत्वावर पदभरती जाहिरात


**वरिष्ठ भूवैज्ञानिक यांचे कार्यालय**
**भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा,**
**नागपूर**
**म.जि.प्रा.इमारत, बी विंग, दुसरा माळा, तेलंगखेडी रोड, सिव्हील लाईन्स, नागपूर**
**ईमेल-sggsdanp@rediffmail.com**
**दूरध्वनी- (०७१२) - २५३४७७६**


---

**जाहिरात क्रमांक : ०२ /२०१५** **दिनांक : / /२०१५**

महाराष्ट्र शासन,पाणीपुरवठा व स्वच्छता विभागा अंतर्गत राष्ट्रीय ग्रामीण पाणी गुणवत्ता संनियंत्रण व सर्वेक्षण कार्यक्रम अंमलबजावणी व क्षेत्र बळकटीकरणासाठी वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, नागपूर यांचे अधिनस्त नागपूर जिल्ह्यात अस्तित्वात असलेल्या प्रयोगशाळेकरिता खालील पदे कंत्राटी तत्वावर भरती करावयाची आहे.

| अ. क्र. | पदाचे नांव | भरावयाची एकूण पदे | आरक्षित पदसंख्या | दरमहा मानधन रुपये | किमान शैक्षणिक अर्हता | अनुभव | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | रसायनी | १ | अ.ज.-१ | १२,०००/- फक्त (शा.नि.अन्वये) | बी.एस्सी(रसायनशास्त्र), MS-CIT उत्तीर्ण प्राधान्य एम.एस्सी रसायनशास्त्र) | प्रयोगशाळेतील पाणी नमुने तपासणीचा /पाणी गुणवत्ता विषयक कामाचा किमान १ वर्षाचा अनुभव | **जाहिरात क्र १ नुसार वर्गवारी मध्ये एकही अर्ज प्राप्त न झाल्यामुळे पुनश्च जाहीरात देण्यात येत आहे.** |
| २ | अनुजैविक तज्ञ | १ | अ.ज.-१, | १२,०००/- फक्त. (शा.नि.अन्वये) | बी. एस्सी (सुक्ष्मजीवशा MS-CIT उत्तीर्ण प्राधान्य एम.एस्सी (सुक्ष्मजीवशास्त्र) | प्रयोगशाळेतील पाणी नमुने तपासणीचा /पाणी गुणवत्ता विषयक कामाचा किमान १ वर्षाचा अनुभव | --- |
| | एकूण | २ पदे | | | | | |

**१. वयोमर्यादा :-**

- उपरोक्त पदाकरिता जाहिरातीच्या प्रसिध्दी दिनांकापर्यंत वयोमर्यादा गणली जाईल.
- उपरोक्त पदाकरीता जाहिरातीच्या दिनांकास उमेदवाराचे वय १८ वर्षापेक्षा कमी व ३३ वर्षापेक्षा जास्त नसावे.
- मागासवर्गीय उमेदवाराचे वय १८ वर्षापेक्षा कमी व ३८ वर्षापेक्षा जास्त नसावे. परंतु उन्नत व प्रगत गटांमधे क्रिमीलेयर (Creamylayer) मोडणाऱ्या वि.आ.-अ, भ.ज.ब, भ.ज.क., भ.ज.ड विशेष मागास प्रवर्ग आणि इतर मागास वर्ग यांना ही सवलत लागू नाही.
- दिनांक १७ ऑगष्ट २०१३ च्या शासन परिपत्रकानुसार नॉन क्रिमीलेयर वैध प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. तसेच अंतिम निवडीपुर्वी मुळ प्रमाणपत्र पडताळणीसाठी मागणी केल्यास सादर करणे बंधनकारक राहील.

२. **अर्ज करावयाची पध्दत** : अर्जाचा नमुना सोबत देण्यात येत आहे.हा नमुना A४ पेपरवर एका बाजुला टंकलिखित करुन उमेदवाराने अर्ज पुर्ण भरावा व स्वयंसांक्षाकित केलेला अलिकडच्या काळातील रंगीत पासपोर्ट साईज फोटो दिलेला जागेवर चिकटवण्यात यावा.

३. **अर्जा सोबत लागणारे कागदपत्रे** : १. शैक्षणिक पात्रतेची सर्व कागदपत्रे २. अनुभवाचे प्रमाणपत्र ३. जातप्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र ४. महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असल्याचे प्रमाणपत्र इत्यादीच्या स्वयंसांक्षाकित केलेल्या सत्यप्रती जोडणे आवश्यक आहे तसे न केल्यास अर्ज अपूर्ण समजुन नाकारण्यात येईल.

४. **अर्जासोबत स्वत:चा संपूर्ण पत्ता लिहिलेला व रुपये ५/-चा पोस्ट टिकिट लावलेला रिकामा लिफाफा (२७ सेमी x १२ सेमी)** सोबत जोडण्यात यावा.

५. **अर्ज स्विकारण्याचा अंतिम दिनांक ०१/ १० /२०१५ सायंकाळी ५.४५ वाजेपर्यत प्रत्यक्ष अथवा टपालाव्दारे.**

६. **अर्ज स्विकारण्याचा पत्ता : वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, मजिप्रा इमारत, बी विंग, दुसरा माळा, तेलंगखेडी रोड, सिव्हील लाईन्स, नागपुर- ४४०००१**

उमेदवाराने अर्ज वरिल पत्त्यावर पोस्टाने किंवा प्रत्यक्ष सादर करावा. विहित दिनांकानंतर / वेळेनंतर आलेले अर्ज कोणत्याही परिस्थितीत स्विकारण्यात येणार नाहीत.

उमेदवारानी लिफाफ्यावर अर्ज केलेल्या पदाबाबत सुस्पष्टपणे .......................................पदासाठी अर्जङ असे नमुद करणे आवश्यक आहे.

टिप- १. वर नमुद केलेल्या पदांची संख्या, पद व आरक्षण यामध्ये बदल होऊ शकतो तसेच भरती प्रक्रिया कोणत्याही टप्प्यावर रद करण्याचे किंवा स्थगित करण्याचे अधिकार निवड समितीला राहतील.

२. वरील सर्व पदे ही निव्वळ कंत्राटी स्वरुपाची आहेत.

३. एका उमेदवाराने कोणत्याही एकाच पदासाठी अर्ज करावा.

४. निवड केलेल्या उमेदवाराची नियुक्ती ११ महिन्याकरिता (६ महिने व ५ महिने याप्रमाणे दोन टप्प्यात तीन दिवसांचा तांत्रिक खंड देऊन ) असेल प्रत्यक्ष ६ महिन्यानंतर कार्यमुल्यमापक समाधानकारक असल्यास तांत्रिक खंड देऊन पुढील ५ महिन्याची मुदतवाढ देण्यात येईल.

५. अर्ज छाननी करुन पात्र उमेदवारांना लेखी परीक्षेस बोलविण्यात येईल.जे उमेदवार लेखी परिक्षेत पात्र ठरतील अशा उमेदवाराना मुलाखतीसाठी बोलविण्यात येईल. त्यासाठी उमेदवारानी स्वखर्चाने हजर राहावे लागेल.

६. पात्र ठरलेल्या उमेदवारांसाठी एकुण ५० गुणाची बहुपर्यायी वस्तुनिष्ठ लेखी परिक्षा (सामान्य ज्ञान, बौध्दिक व विश्लेषणात्मक क्षमता, गणितीय क्षमता, विषयांचे ज्ञान, संगणकाचे ज्ञान व स्थानिक बाबींचे ज्ञान) व पात्र उमेदवारांची २५ गुणांची तोंडी परीक्षा घेण्यात येईल. लेखी परीक्षेमध्ये एकूण ५० प्रश्नांकरीता १ तासाचा कालावधी राहील.

७.लेखी परिक्षा व मुलाखतीचे वेळापत्रक उमेदवारांना टपाल/दूरध्वनी /भ्रमणध्वनी/एस.एम.एस.सेवा/ई मेलव्दारे कळविण्यात येईल.

८.वरिल कंत्राटी सर्व पदाकरिता शासन नियमाप्रमाणे वयोगटाची अट राहील.

**सविस्तर तपशिलासाठी शासनाचा** संकेतस्थळावर (संकेतांक२०१५०२२३१११६२२२०२८) उपलब्ध असलेला पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग ,शासन निर्णय क्र डब्ल्यु /प्र.क्र.५९/ पा.पु.१२ दिनांक २३/०२/२०१५ व **महाराष्ट्र शासन,पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,पत्र क्र.डब्ल्युक्युएम-२०१४/प्र.क्र.५९/पापु-१२, दि.०३.०७.२०१५** चे अवलोकन करावे. तसेच निवड प्रक्रियेसंबंधी माहीतीचा सविस्तर तपशील www.nagpur.nic.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.

सदस्य सचिव निवड समिती तथा<br>वरिष्ठ भूवैज्ञानिक,<br>भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा,<br>नागपूर

अध्यक्ष निवड समिती तथा<br>मुख्य कार्यकारी अधिकारी,<br>जिल्हा परिषद,<br>नागपूर

# अर्जाचा नमुना

**टिप; अर्जदाराने अर्जातील सर्व माहिती भरणे आवश्यक आहे. या जाहीरातील विहित नमुन्यात नसलेले अर्ज, टंकलिखित नसलेले अर्ज, अपुर्ण माहिती भरलेले अर्ज, अव्यवस्थितीत असलेले अर्ज व विलंबाने प्राप्त झालेले अर्ज अप्राप्त ठरविण्यात येतील.**

| फक्त कार्यालयीन उपयोगाकरिता | |
|---|---|
| **अर्जाचा कार्यालयीन नोंदणी क्रमांक** | |

पासपोर्ट आकाराचा फोटो चिकटवून स्वत: साक्षांकित करणे

१. पदाचे नाव (ठळक अक्षरात) :-----------------------------------------------

२. उमेदवाराचे संपूर्ण नाव :-----------------------------------------------------

३. लिंग (पुरुष/स्त्री) :-----------------------------------------------

४. जन्मतारीख :---------------------------------------------
(१.४.२०१५ रोजी) वय ;
वर्ष..................महिने................दिवस................

५. पत्रव्यवहाराचा पत्ता :---------------------------------------------
:------------------------------------------

६. कायमस्वरूपी पत्ता :---------------------------------------------
:---------------------------------------------

७. दूरध्वनी (STD कोडसह)व भ्रमणध्वनी क्रमांक :---------------------------------------

८. ई मेल पत्ता :---------------------------------------------

९. जात :-----------------------जातीचा प्रवर्ग----------

१०. अर्जदार विवाहित/अविवाहित असल्यास अशी ✓ खुण करावी

| विवाहित | | अविवाहित | |
|---|---|---|---|
| | | | |

११. संगणकावर (एम.एस.सी.आय.टी वा तत्सम प्रोग्राम)काम करण्याचा अनुभव आहे काय? :---------------------------------------

१२. शैक्षणिक अर्हता

| अ.क्र. | शैक्षणिक अर्हता | परिक्षा मंडळाचे / विद्यापीठाचे नाव | टक्केवारी | उत्तीर्ण वर्ष | अर्जासोबत सत्यप्रत जोडली आहे /नाही |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

१३. अनुभवाचा तपशील :

| अ.क्र. | काम केलेल्या कार्यालयाचे नांव व पत्ता | पदाचे नाव व वेतनश्रेणी | कामाचा कालावधी | | कामाचे स्वरूप |
|---|---|---|---|---|---|
| | | | पासुन | पर्यत | |
| | | | | | |
| | | | | | |

**१४.** इतर माहिती : ------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------

## प्रतिज्ञापत्र

मी श्री/श्रीमती प्रमाणित करतो /करते कि, वर नमूद केलेला तपशिल माझ्या माहितीप्रमाणे सत्य व अचूक आहे. अर्जात उल्लेख केलेली सर्व सर्टिफिकेटस् (दाखले) मुळ प्रतीमध्ये सादर करावी लागतील याची जाणीव मला आहे. अर्जात नमूद केलेली माहिती खोटी अगर चूकीची आढळून आल्यास अर्ज अपात्र करणेस, नोकरी गमाविण्यास व त्या अनूषंगाने होणाऱ्या इतर कारवाईस पात्र राहील. तसेच सदर पदावरील नियूक्ती ही तात्पूरत्या स्वरुपातील निव्वळ कंत्राटी पध्दतीवर असल्याने **शासन सेवेत कायम करण्यासाठी हक्क राहणार नाही** याची मला पूर्णपणे जाणीव असून शासन सेवेत कायम करण्यासाठी भविष्यात हक्क सांगणार नाही अशी लेखी हमी देत आहे.

दिनांक : / /२०१५

ठिकाण : अर्जदाराची स्वाक्षरी

(अर्जदाराचे नाव नाव ---------------------------------)

वरिष्ठ भुवैज्ञानिक,
भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, नागपुर

पासपोर्ट आकाराचा फोटो चिकटवून स्वत: साक्षांकित करणे

# प्रवेशपत्र

| आसन क्रमांक | |
|---|---|

अर्ज केलेल्या पदाचे नांव----------------------

उमेदवाराचे पूर्ण नाव व पत्ता------------------------------------------
-----------------------------------------------------------------
-----------------------------------------------------------------
-----------------------------------------------------------------

वरिष्ठ भुवैज्ञानिक,
भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा,
नागपुर

टिप- आसन क्रमांक वगळता हि माहिती उमेदवाराने भरावी.

**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय,मुंबई,शासन निर्णय क्र . डब्ल्यूक्युएम-२०१४/प्रक्र.५९/पापु- १२ दिनांक २३/०२/२०१५ नुसार कंत्राटी मन्युष्यबळ भरती व निवड प्रक्रिया :**

राष्ट्रीय ग्रामीण पाणी गुणवत्ता सनियंत्रण व सर्वेक्षण कार्यक्रमांतर्गत,मंजूर कंत्राटी मन्युष्यबळाची भरती करतांना शैक्षणिक अर्हता व अनुभव प्राप्त उमेदवारांची लेखी परीक्षा घेण्यात येईल. लेखी परीक्षा/कौशल्य चाचणीमध्ये मिळालेल्या गुणांच्या आधारे१:१०(सर्वोच्च गुण मिळविणारे १० उमेदवार) या प्रमाणात उमेदवारांना मुलाखतीसाठी आमंत्रीत करण्यात येईल. मुलाखतीमधील प्राप्त गुणक्रमांनुसार उमेदवारांची निवड यादी (Selection list) व प्रतिक्षा यादी (Waiting list) करण्यात येईल. सर्व पदांकरीता १:५ या प्रमाणे प्रतिक्षा यादी तयार करण्यात येईल.

प्राप्त झालेल्या अर्जाच्या छाननी नंतर पात्र ठरलेल्या उमेदवारांसाठी एकूण ५० गुणांची बहूपर्यायी वस्तुनिष्ठ लेखी परीक्षा राहील. या सर्व उमेदवारांची २५ गुणांची तोंडी परीक्षा घेण्यात येईल. लेखी परीक्षेमध्ये एकूण ५० प्रश्नांकरीता १ तासाचा कालावधी राहील.

**लेखी परीक्षा**

| **अ.क्र.** | **विषय** | **गुण** |
|---|---|---|
| १ | सामान्य ज्ञान | १० |
| २ | बौध्दिक व विश्लेषणात्मक क्षमता | १० |
| ३ | गणितीय क्षमता | १० |
| ४ | विषयांचे ज्ञान | १० |
| ५ | संगणकाचे ज्ञान | ०५ |
| ६ | स्थानिक बाबींचे ज्ञान | ०५ |
| | **एकूण** | ५० |

**तोंडी परीक्षा**

| **अ.क्र.** | **विषय** | **गुण** |
|---|---|---|
| १ | किमान शैक्षणिक अर्हता | ५ गुण (टक्केवारीनुसार) |
| २ | उच्च शैक्षणिक अर्हता | ५ गुण (टक्केवारीनुसार) |
| ३ | अनुभव | १० गुण |
| ४ | व्यक्तीमत्व | ०५ गुण |
| | **एकूण** | २५ गुण |

**नेमणूक आदेश** : विभागीय व जिल्हा संनियंत्रण कक्ष आणि जिल्हा व उपविभागीय प्रयोगशाळेसाठी निवड केलेल्या कंत्राटी उमेदवारांची नेमणूक , गरजेनुसार प्रतिक्षा यादीतील उमेदवारांची नेमणूक व पुनर्नियुक्ती, प्रादेशिक उपसंचालक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, हे करतील. नियुक्तीचे आदेशाच्या सात दिवसाच्या कालावधीत उमेदवाराने हजर होणे अनिवार्य आहे. सात दिवसापेक्षा जास्त कालावधी नंतर आदेश आपोआप रद्द होतील व प्रतिक्षा यादीतील गुणांकनानुसार पुढील उमेदवाराची नेमनुक करण्यात येईल.

**कंत्राटी पदांचे मानधन व करारनामा :** कंत्राटी पध्दतीने भरावयाच्या मनूष्यबळासाठी ठोक मानधन अनुज्ञेय राहील. संबंधितासमवेत करारनामा करून ०६ महिने व ०५ महिने या प्रमाणे दोन टप्प्यात तीन कार्यालयीन दिवसाचा खंड देवून ११ महिन्यांसाठी कंत्राटी पध्दतीने नियुक्ती करण्यात येईल. कंत्राटी पध्दतीने नियुक्ती/मुदतवाढ देतांना विहित नमुन्यातील रू. १००/- च्या मुद्रांकपत्रावर बंधपत्र करण्यात येईल.

# कर्तव्य व जबाबदा-या

## रसायनी

१. पाणी  गुणवत्ता सनियंत्रण व सर्वेक्षण कार्यक्रमांतर्गत जिल्हयातील पिण्याच्या पाण्याची प्रतिदिन १० ते १५ नमुने रासायनिक तपासणी करणे.
२. दैनंदिन तपासणी केलेल्या रासायनिक नोंदी विहित नमुन्यात दररोज रजिस्टर मध्ये घेणे. रासायनिक यांनी त्यांना देण्यात आलेल्या नोंद वहया अद्यावत ठेवणे गरजेचे आहे. नमुना प्राप्त नोंद वही, पृथ:करण नोंद वही, निरिक्षण नोंद वही इ. तसेच केंद्र व राज्य शासनाच्या संकेतस्थळावर नोंदकरून घेणे.
३. प्रयोगशाळेतील पाणी गुणवत्तेसंबधी माहिती उप मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद यांच्या अधिपत्या खाली काम करणारा (पाणी गुणवत्ता तज्ञ व जिल्हा पाणी गुणवत्ता निरिक्षक ) यांना देणे.
४. राज्य व जिल्हा स्तरावरून वेळोवेळी देण्यात येणा-या पाणी गुणवत्ते संबधी सूचनांचे पालन करणे.
५. अनुजैविक तज्ञ यांच्या अनुपस्थीतीत रसायनी यांनी स्वत:च्या कामासोबत अनुजैविक तज्ञ यांची कामे पाहावीत.
६. रसायनी यांनी संयंत्रे व उपकरणे चालू स्थितीत राहतील यांची काळजी घ्यावी. पृथक्करणसाठी आवश्यक द्रावणे व इतर रसायने रसायनी यांनी तयार करावीत.  उपकरणे , संयंत्रे व काच सामान स्वच्छ राहतील याची दक्षता घेतील.
७. रासायनिक तपासणीचा विश्लेषणात्मक अहवाल दर महिण्याच्या ५ तारखेपर्यंत राज्य व विभागीय स्तरावर पाठविण्यात यावा.
८. राज्य, विभागीय व जिल्हा स्तरावरून वेळोवेळी आयोजित केलेल्या प्रशिक्षणास उपस्थित राहाणे.

## अनुजैविक तज्ञ

१. पाणी  गुणवत्ता सनियंत्रण व सर्वेक्षण कार्यक्रमांतर्गत जिल्हयातील पिण्याच्या पाण्याची प्रतिदिन १० ते १५ नमुने अनुजैविक तपासणी करणे.
२. दैनंदिन तपासणी केलेल्या जैविक नमुन्याच्या नोंदी विहित नमुन्यात दररोज रजिस्टर मध्ये घेणे. अनुजैविक तज्ञ यांनी त्यांना देण्यात आलेल्या नोंद वहया अद्यावत ठेवणे गरजेचे आहे. नमुना प्राप्त नोंद वही, पृथ:करण नोंद वही, निरिक्षण नोंद वही इ. तसेच केंद्र व राज्य शासनाच्या संकेतस्थळावर नोंदकरून घेणे.
३. प्रयोगशाळेतील पाणी गुणवत्तेसंबधी माहिती उप मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद यांच्या अधिपत्या खाली काम करणारा (पाणी गुणवत्ता तज्ञ व जिल्हा पाणी गुणवत्ता निरिक्षक ) यांना देणे.
४. राज्य व जिल्हा स्तरावरून वेळोवेळी देण्यात येणा-या पाणी गुणवत्ते संबधी सूचनांचे पालन करणे.
५. रसायनी यांच्या उपस्थीतीत अनुजैविक तज्ञ यांनी स्वत:च्या कामासोबत रसायनी यांची कामे पाहावीत.
६. अनुजैविक तज्ञ यांनी जैविक तपासणीची सर्व उपकरणे चालू स्थितीत राहतील यांची काळजी घ्यावी. पृथक्करणसाठी आवश्यक काच  सामान व नमुना बाटल्या निर्जतुकीकरण करून ठेवावे.व पृथक्करणासाठी आवश्यक मिडीया तयार करून ठेवणे.
७. अनुजैविक तपासणीचा विश्लेषणात्मक अहवाल दर महिण्याच्या ५ तारखेपर्यंत राज्य व विभागीय स्तरावर पाठविण्यात यावा.
८. राज्य, विभागीय व जिल्हा स्तरावरून वेळोवेळी आयोजित केलेल्या प्रशिक्षणास उपस्थित राहाणे.